परिपत्रक
=======

क्रमांक. एकत्री/योजना/८९.
मुंबई, दिनांक ७-६-१९८९.

विषय :- जमिन एकत्रिकरण योजना तयार करताना घ्यावयाची खबरदारी

जमिन एकत्रिकरण योजना तयार करताना पुढील बाबींची पूर्तता करावी.

१] आकारबंदावरून शेतपुस्तक लिहीण्याचे काम पूर्ण झालेनंतर त्याच्या पानावर बेरजा मारून त्याचे मेळपत्रक तयार करावे. मेळपत्रक शेतपुस्तकाचे शेवटी जोडून त्यानंतर भूमि अभिलेखावरून, अधिकार अभिलेखावरून, तयार/तपास करणार, शेत महाजनी करणार. मेळपत्रक तयार करणार यांच्या सह्या, नावे, हुद्दा व दिनांक वगैरे तपशील द्यावा.

२] एकत्रिकरण योजनेच्या सुरुवातीस गटसूची तयार करावी. तसेच शेवटी ९ [३], ९ [४] चे प्रत्येक पान बेरीज द्यावी व शेवटी पानवार बेरीज क्रमांकाने उतरून एकूण गट क्षेत्राची बेरीज द्यावी व त्याखाली गावाचे एकूण पड, गांवठाण नदी नाले, रस्ते यावतचे क्षेत्र दर्शवून गावाचे एकूण क्षेत्राचा मेळ ९/३ व ९/४ चे बाजूस दर्शवावा. त्यानंतर कामाच्या जबाबदारीप्रमाणे तयार करणार/तपास करणार यांच्या सह्या वगैरे तपशील द्यावा.

३] एकत्रिकरण योजनेसाठी तयार करावयाचे नकाशे हिस्सा प्लॉटींग करून नंतर ब्ल्यू प्रिंट पध्दतीने आवश्यकते नुसार त्याच्या प्रती तयार केल्या जातात. या ब्ल्यू प्रिंट प्रति कालांतराने अस्पष्ट दिसतात. हे नकाशे मूळ अभिलेख असल्याने कायम स्वरूपी जतन करणे आवश्यक असून ते सुस्थितीत व सुस्पष्ट असणे नितांत जरूरीचे आहे. यासाठी नकाशे टेसिंग क्लॉथवर तयार करावेत.

४] एकत्रिकरण योजनेचा नियम ९[३] व ९[४] तक्त्याच्या दोन्ही प्रति परिपूर्ण असाव्यात.

५] इकडील कार्यालयाचे तपासणीचे वेळी एकत्रिकरण योजनेपूर्वी अस्तित्वात असलेले सामाईक खाते बंद करून सामाईक मालकी हक्काची जमिन एकाचे किंवा दोघांचे वैयक्तिक खात्यावर दिली जाते असे आढळून आले असून अशा रितीने वैयक्तिक खात्यावर दिलेल्या जमिनीची जबाबदारी आधारे हलकी भारी प्रमाण विचारात घेऊन अदलाबदल केली जाते व अदलाबदल झाल्यामुळे इतर सामाईक हक्कदार यांचा जमिनीचे क्षेत्राचा मेळ घेता, पूर्वी पेक्षा जमिन त्याचे खातेवर कमी नोंदल्याचे आढळून येते व परिणामी तक्रारीस वाव मिळतो. तरी सामाईक खाते यापुढे एकत्रिकरण योजनेत बंद करू नये. त्यामुळे योजनेवर काहीही परिणाम होत नाही.

[illegible]
उपसंचालक भूमि अभिलेख
कोंकण प्रदेश मुंबई.

[कृ.मा.

प्रत :- सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी १ ठाणे मु. मुरबाड, २ पालघर,
४ वाडा, ५ शहापूर, ६ जव्हार.

सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी १ रायगड मु. अलिबाग,
२ पेण, ३ मुरुड, ५ रोहा, ४ माणगांव, ६ महाड, ८ पोलादपूर,
९ म्हसळा, १० श्रीवर्धन.

सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी १ रत्नागिरी, ३ देवरुख,
४ देवरुख, ५ राजापूर, ६ चिपळूण, ७ दापोली, ८ गुहागर,
९ मंडणगड, १० खेड.

सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी १ कणकवली, २ कुडाळ,
३ सावंतवाडी, ४ मालवण, ५ देवगड यांना माहितीसाठी व
कार्यवाहीसाठी.

प्रत :- एकत्रिकरण अधिकारी ठाणे/रायगड मु. अलिबाग/महाड/
चिपळूण/रत्नागिरी/सिंधुदुर्ग मु. सावंतवाडी यांना माहितीसाठी
व कार्यवाही करुन घेणेसाठी.